MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

**सरकारी दवाखान्याचा ओएस प्रकाश सानप भ्रष्टाचाराने बरबटलेला आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंतांच्या विरोधात?वाचा लवकरच**

पान १ वरून...

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –९१ | बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -91 | WEDNESDAY DT.20 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# संशयित बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव अन् संचालकांचे पासपोर्ट जप्त करा

## बीड जिल्हा स्वाभिमान संघटनेचे पोलिस अधिक्षकांना निवेदन

### गपगुमान पैसे वाटप करा नसता फिरणं मुश्किल करू –प्रा.सचिन उबाळे




**बीड : सर्वसामान्यांच्या ठेवी परत मिळण्यासाठी बीड जिल्हा स्वाभिमान संघटनेने आपला लढा तिव्र केला असून आता निकाल लागेपर्यंत यातून माघार नाही. लढा असाच सुरू राहील परंतू तो पर्यंत हे स्वयंघोषित 'सहकारमहर्षि ' बाहेर पळून जावू नयेत म्हणून मंगळवारी (दि.१९) पोलिस अधिक्षकांना निवेदन देवून त्या सर्वांचे पासपोर्ट जप्त करावेत अशी मागणी प्रा.सचिन उबाळे यांनी केली आहे.**

तसेच संशयित व्यवहार असणार्या सर्वच बँकांनी ठेवीदारांचे पैसे गपगुमान परत करावेत नसता त्यांना आपण फिरणं मुश्किल करू असा इशाराही प्रा.उबाळे यांनी दिला आहे.

बीड जिल्ह्यातील आणि शहरातील मातोश्री, जिजाऊ, ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, मराठवाडा अर्बन (माजलगाव) या बँकांचे व्यवहार संशयाच्या भोवर्यात आलेले आहेत. या अनुषंगाने आम्ही गेल्या आठ दिवसांपासून या संबंधी आंदोलन सुरू केलेले आहे. संबंधीत बँकांच्या प्रशासनाकडून फक्त ठेवीदारांना तारखा दिल्या जावू लागल्या आहेत. लग्नकार्य, शिक्षण, दवाखाना यासह संसाराचा रहाटगाडा चालविण्यासाठी सर्वसामान्य ठेवीदार आता होरपळला जावू लागला आहे. त्याच अनुषंगाने मंगळवारी (दि.१९) सुभाष रोडवरील ज्ञानराधाच्या शाखेसमोर शेकडो ठेवीदार जमा झाले होते. त्यांना धीर देत थेट एस.पी.ऑफीसमध्ये जावून पोलिस अधिक्षकांची भेट घेण्यात आली. यावेळी पोलिस अधिक्षकांना शहरातील भिषण परिस्थितीची माहितीही देण्यात आली. तसेच या सर्वच बँकांच्या पदाधिकार्यांचे पासपोर्ट तात्काळ जप्त करण्यात यावेत जेणे करून ते कुठेही परदेशात जावू नयेत. पोलिस अधिक्षकांनीही निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद देत या संबंधी कारवाई करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान संबंधीत सर्वच बँकांनी आमच्या आंदोलनाला हलक्यात घेवू नये. माझे तुमच्या कुठल्याही बँकेत खातं नाही आणि तुमचं माझ्याकडं कर्जही नाही त्यामुळे याला–त्याला मध्ये घालून काहीही उपयोग नाही. मला माझ्या ठेवीदारांच्या ठेवींची काळजी आहे आणि त्यांचा एक–एक रुपया परत मिळेपर्यंत माझा लढा सुरूच राहील असा इशाराही प्रा.सचिन उबाळे यांनी मीडियाशी बोलताना दिला.



### आज डिडीआर ऑफीसला भेट

बीड शहर आणि जिल्ह्यातील संशयित बँकांच्या बाबतीत माझे आंदोलन सुरू आहे. ज्या संस्थांचा व्यवहार पारदर्शक आहे त्यांना घाबरण्याची गरज नाही. परंतू इतर बँकांच्या व पतसंस्थांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे. खरंच ठेवीदारांचा विश्वास त्यांनी तंतोतंत पाळलेला आहे का? या संबंधी माहिती घेण्यासाठी आज आम्ही शहरातील जालना रोडवर असलेल्या डिडीआर ऑफीसला भेट देणार असून संबंधीत सर्वच बँकांच्या पूर्ण रेकॉर्डची माहिती त्यांच्याकडून घेणार असून या नंतर ज्या–ज्या बँका, पतसंस्था दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करावी आणि ठेवीदारांना काही होण्या अगोदरच वाचविण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचेही प्रा.सचिन उबाळे यांनी सांगितले आहे.

### दोन सॉफ्टवेअरची भानगड काय ?

पोलिस अधिक्षकांच्या भेटी दरम्यान प्रा.सचिन उबाळे यांनी महत्त्वाचा मुद्दा मांडला. अनेक बँकांमध्ये दोन सॉफ्टवेअर असल्याची चर्चा आहे. एक सॉफ्टवेअर शासन दरबारी ठेवी दाखविण्यासाठी आणि दुसरे सॉफ्टवेअर आपलं उकळ पांढरं करण्यासाठी असाच प्रकार अनेक ठिकाणी असल्याचे बोलले जात आहे. त्याच अनुषंगाने आम्ही जिल्हाधिकार्यांनाही भेटणार असून बीड जिल्ह्यातील प्रत्येक बँक, पतसंस्था, निधी, अर्बन आणि को–ऑपरेटिव्ह बँकांची झाडाझडती घेण्याची मागणी करणार असल्याचेही प्रा.उबाळे यांनी पत्रकात म्हटले आहे.

# दुर्दैवी घटना! धुळे–सोलापूर महामार्गावर भीषण अपघात तिघांचा जागीच मृत्यू

गेवराई । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात एक भीषण अपघाताची बातमी समोर येत असून, ज्यात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंकुशनगर येथे धुळे–सोलापूर महामार्गावर हा भीषण अपघात झाला आहे. पुलावर उभ्या असलेल्या कंटेनरला मागून आलेल्या भरधाव कारने धडक दिली. ज्यात कारमधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन पुरुषांसह एका १० वर्षांच्या मुलीचा समावेश आहे.




अंबड तालुक्यातील अंकुशनगर येथील धुळे–सोलापूर महामार्गावर कारने रस्त्यावर उभा असलेल्या कंटेनरला मागून जोराची धडक दिल्याने भीषण अपघात काही वेळापूर्वी घडला आहे. दरम्यान, हा अपघात एवढा भीषण होता की, कारच्या समोरील भागाचा चक्काचूर झाला आहे. तसेच, कारमध्ये असलेल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. तसेच, अपघातात मयत झालेल्या व्यक्तिंचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

# बीड शहरात नगरोत्थान योजनेतील कोट्यवधींची विकासकामे पूर्णत्वास

## अंकुश नगर, जुना धानोरा रस्त्याच्या कामाची डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केली पाहणी

बीड : शहरातील विविध भागात नगरोत्थान योजनेमधून करण्यात आलेली कोट्यवधींची विकासकामे पूर्णत्वास जात आहेत. याच योजनेतून अंकुश नगर, नवीन सरस्वती शाळा परिसरात होत असलेल्या रस्त्यांच्या कामाची राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.२०) पाहणी केली.

नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून नगरोत्थान योजनेतून शहरात कोट्यवधींची विकासकामे मंजूर करण्यात आली. यातून अनेक भागातील रस्त्यांची कामे पूर्णत्वास जात आहेत. अंकुश नगर भागातील हनुमान मंदिराजवळ सिमेंट रोडचे दर्जेदार काम झाले आहे. या कामाची पाहणी करून उर्वरित रस्त्यांची कामेही गतीने पूर्ण केले जातील, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.



यावेळी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. याप्रसंगी नगरसेवक रणजीत बनसोडे, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, डॉ.रमेश शिंदे, गजानन जवकर, विठ्ठल गुजर, राजाभाऊ बनसोडे, उमेश डोईफोडे, संजय जाधव, किशोर झोडगे, किरण कुंभारकर, महादेव लोंढे, सुदाम शेळके, शिवाजी चांगन, किसन हाडूळे, हातागळे, लक्ष्मण सिरसट, श्री.ढाकणे, संतोष पवार, शीतल जाधव, श्रीमती.सिरसट, झोडगे, वाव्हळ, अनुजा कुंभारकर, गंगा लोंढे, माधुरी पवार यांच्यासह महिला–पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच, जुना धानोरा रस्त्याच्या कामाची पाहणी करण्यात आली. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर यांचा नगरसेवक रवींद्र कदम यांच्यासह स्थानिक नागरिकांनी सत्कार केला. यावेळी भाऊसाहेब कदम, नगरसेवक गणेश वाघमारे, रवींद्र कदम, शांतीनाथ डोरले, सतीश धांडे, बप्पा शिराळे, राम सिरसट, मिलिंद ठोकळ, विशाल वाघमारे, प्रदीप वाघमारे, शिलवंत सर, ऋषीकेश राऊत, संकेत कदम, संतोष खटाणे, शाहू पिंगळे यांच्यासह स्थानिक नागरिकांची उपस्थिती होती.

नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून नगरोत्थान योजनेच्या टप्पा क्रमांक १ आणि २ मधून शहरात कोट्यवधींची विकासकामे मंजूर करण्यात आली. यातील बहुतांश रस्त्याची कामे पूर्णत्वास गेली आहेत. ही काम दर्जेदार होत असून ठिकठिकाणीच्या नागरिकांमधून रस्त्याच्या दर्जेदार कामांचे कौतुक केले जात आहे.

# राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत पर्जन्यमापन यंत्र बसविणार – धनंजय मुंडे

**प्रतिनिधी । बीड**

राज्यातील १६ हजार ग्रामपंचायतीमध्ये अद्ययावत पर्जन्य मापन यंत्र बसवण्याचे नियोजन शासन करत असून, पहिल्या टप्प्यात ३ हजार पेक्षा अधिक ग्रामपंचायतीत ही यंत्रे बसवण्यात येतील. याद्वारे शेतकऱ्यांना पावसाच्या अचूक माहितीसह, पावसाचे मोजमाप व त्यामुळे झालेल्या नुकसानाची अचूक माहिती मिळेल व त्यानुसार निर्णय घेणे सोपे होईल, असे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विधानपरिषदेत सांगितले.नियम ९७ अन्वये अवकाळी पाऊस व गारपीट यावर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती. यावर उत्तर देतांना मंत्री श्री. मुंडे बोलत होते.

मंत्री श्री. मुंडे म्हणाले, राज्यात नमो किसान महासन्मान योजनेतून सुमारे ८६ लाख शेतकऱ्यांना पहिल्या हफ्त्यापोटी १७२० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले. यामधील निकषांमुळे पात्र लाभार्थी वंचित राहू नयेत यासाठी राज्यभर चार महिने विशेष मोहीम राबवण्यात आली. पीक विमा योजनेतून शेतकऱ्यांना विमा भरण्यासाठी केवळ एक रुपया द्यावा लागला तर दुसरीकडे आतापर्यंत सुमारे ५२ लाख शेतकऱ्यांना अग्रीम २५% प्रमाणे २२१६ कोटी रुपये रक्कम मंजूर करून त्यापैकी आतापर्यंत १७०० कोटींपेक्षा अधिक रक्कमेचे वितरण पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित रक्कमेचे वितरण सुरू आहे. सहा जिल्ह्यातील विमा कंपन्यानी केंद्र सरकार कडे अपील केले असून, ती सुनावणी पूर्ण झाल्यानंतर या सहा जिल्ह्यांचा विमा देखील अग्रीम प्रमाणे दिला जाईल. या वर्षी अग्रीम अंतर्गत देण्यात आलेली मदत ही मागील ५ वर्षातील रक्कमेच्या तुलनेत अनेक पटींनी असल्याचे असेही मंत्री श्री मुंडें यांनी सांगितले.

अवकाळी व गारपीटीचे अनुदान नवीन घोषणेप्रमाणे वाढीव दराने मंजूर करण्यात येत असून यांतर्गत बाधित शेतकऱ्यांना सुमारे १४५८ कोटी रुपयांची मदत दिली जाणार आहे, त्याचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण देखील सुरू केले आहे, असेही श्री. मुंडे म्हणाले. त्याचबरोबर त्यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, फळपिक विमा, यांसह शासनाने लाभ दिलेल्या अन्य योजनांची देखील आकडेवारी विधानपरिषदेत दिली.शेतीत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची शक्यता तपासून आता शेतकऱ्यांचे श्रम कमी व्हावेत यादृष्टीने राज्यात 'ड्रोन मिशन' राबविण्यात येणार असून याचाच एक भाग म्हणून कृषी विद्यापीठांमधून याबाबतचा स्वतंत्र पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे, याचा शेतकऱ्यांना नक्कीच लाभ होईल, असेही श्री. मुंडे पुढे म्हणाले.

धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांची मदत २ हेक्टरच्या मर्यादेत करण्याची घोषणा श्री. मुंडे यांनी यावेळी केली, यासाठी १ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचेही ते म्हणाले.२२ हजार ग्रामपंचायतीमध्ये वॉटर ग्रीड योजना आणणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात प्रथमच कांद्याची महाबँक स्थापन करण्यात आल्याचे जाहीर करुन 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने'मध्ये ४४ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ७६२ कोटी रुपये इतका कर्जमाफीचा लाभ देण्यात आला असल्याचे मंत्री श्री. मुंडे यांनी सांगितले.

यावेळी चर्चेत सदस्य सर्वश्री गोपीचंद पडळकर, एकनाथ खडसे, प्रवीण दरेकर, सुरेश धस, प्रज्ञा सातव, नरेंद्र दराडे, अरुण लाड, अभिजीत वंजारी, अनिल परब,रमेश कराड, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला होता.




केज विधानसभा मतदारसंघाची लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीची बैठक भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष अजित गोपछडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आ .नमिता ताई अक्षय मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत अंबाजोगाई येथे संपन्न झाली . यावेळी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा काकाजी, भाजपा तालुका अध्यक्ष भगवान केदार, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अच्युत बापू गंगणे, बाजार समितीचे उपसभापती डॉ वासुदेव नेहरकर, ज्येष्ठ नेते सुनील आबा गलांडे ,भारत पप्पा काळे, शरद इंगळे, मुरलीधर बप्पा ढाकणे, दिलीप भिसे यांच्यासह केज विधानसभा मतदारसंघातील सर्व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्याधिकारी निता अंधारे यांनी विविध लेखा शीर्षकारवाली आलेला निधी गुत्तेदाराच्या घशात घातला

## गणेश पगारे,सय्यद सलीम यांच्या बद्दली साठी अर्थपूर्ण प्रयत्न केले

बीड (प्रतिनिधी)

२० डिसेंबर मुख्याधिकारी निता अंधारे यांचा हुकमशाही, अनागोंदी व भ्रष्ट कारभार सुरु असून नगरपरिषदेमध्ये येणाऱ्या जेष्ठ कनिष्ठ नागरिकांसह त्यांचेकडे काही अडचण सांगण्यासाठी आलेल्या उभयतांना अरेरावी व उद्धट भाषेत बोलून मनमानी, हुकमशाही,वर्तन करत असून कर्तव्यात कसूर करत आहेत ,शहरात जागोजागी कचऱ्याचे ढिगारे असून प्रचंड अस्वछता पसरली आहे या अस्वच्छतेमुळे शहरातील प्रत्येक भागात रोगराई निर्माण होत आहे, मुख्याधिकारी निता अंधारे या नागरी सुविधा पुरविण्या पेक्षा गुत्तेदारी करण्यात व्यस्त असून मान्सून पूर्व स्वच्छतेसाठी जेसीब वर अंदाजे सतरा लाख रु उधळपट्टी केली असून विविध लेखाशीर्षका खाली येणाऱ्या निधीचा गैरवापर करत पुरी नामक गुत्तेदारास लाखो रुपयांचे कामे दिली आहेत





प्रत्येक कामात त्यांच्या भावाच्या अडून त्यांचीच भागीदारी असल्याचे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातुन जेष्ठ नगरसेवक भिमराव वाघचौरे,गणेश वाघमारे,अँड विकास जोगदंड यांनी सांगितले आहे पुढे पत्रकातून नगरपरिषदेच्या भ्रष्ट कारभाराचे धिंडवडे काढत नगर परिषदेच्या २०१६ ते २०१९ पर्यंतच्या लेखापरीक्षणात तत्कालीन लेखापाल गणेश पगारे यांचे विरुद्ध अनियमितेचा गंभीरपणे टपका ठेवण्यात आला असल्याने ,तत्कालीन मुख्याधिकारी यांनी दिनांक ०८/०८/२०१७ रोजी जा.क्र.बीनप/कावि/आस्था-२/२०८नुसार नोटीस बजावून कार्यमुक्त झाल्यास ही धनादेश व इतर लेखा स्वतः जवळ ठेवल्याने गैरकारभाराविरोधात नोटीस बजावत कार्यवाही करण्यात येईल असे आदेशीत केले होते तसेच शेख खाजमिया शेख इब्राहिम यांनी दिनांक ०६/०१/२०२३ रोजी मा पोलीस अधीक्षक यांना लेखापाल गणेश पगारे यांचे विरुद्ध तक्रार अर्ज दिलेला आहे

या सर्व प्रकारावरून लेखापाल गणेश पगारे यांचा बीड नगर परिषदेमधील कार्यकाळ भ्रष्ट हेतूने पुरस्कृत, विवादीत असा राहिला असल्याने त्यांची बदली इतरत्र होताच पुन्हा बीड नगर परिषदेत येण्यासाठी राजकीय आणि आर्थिक पाठबळ लावत धडपड करून बदली करून घेतात विशेष म्हणजे नगर परिषद संचालनालय, मुंबई, दिनांक २९ में २०२३ रोजी लेखापाल गणेश पगारे यांची पाटोदा नगर परिषद येथून जामखेड नगर परिषद येते बदली होते आणि लागलीच सहा महिन्यात बीड नगर परिषदेत बदली करण्यात येते हा सर्व खटाटोप गणेश पगारे का करत आहेत याचा अर्थ काय? या मागचा उद्देश केवळ आणि केवळ भ्रष्ट कारभार करणे हाच असल्याचे जाणवत आहे

### वैयक्तिक आमचे कुणाशी वैर नाही भ्रष्टाचार मुक्त नगरपालिका हेच आमचे ध्येय नगरसेवक भिमराव वाघचौरे,गणेश वाघमारे,अँड विकास जोगदंड

तसेच दिनांक ०१/०८/२०१७ रोजी नगर परिषदेच्या विशेष सभेत सहाय्यक नगर रचनाकार सय्यद सलीम,सय्यद याकूब यांचे बेकायदेशीर रित्या नामंतर करणे चुकीचे फेरफार करणे अशा भ्रष्ट कारभारा विरुद्ध कार्यवाही करण्यात यावी या बाबत ठराव पारित केला असून भ्रष्टाचारी पार्श्वभूमी असलेल्या लेखापाल गणेश पगारे व सय्यद सलीम यांना बीड नगर परिषदेत भ्रष्टाचार करण्यासाठी शासन मान्यता देत आहे का किंबहुना लेखापाल गणेश पगारे व सहाय्यक रचनाकार सय्यद सलीम यांना रुजू करून घेण्यासाठी मुख्याधिकारी निता अंधारे एवढ्या सक्रिय का? सध्या लेखा विभागात ब दर्जाच्या लेखापाल असतांना क वर्गाचे लेखापाल गणेश पगारे यांना पदभार देण्याचा हेतू काय आहे या सर्व प्रकरात स्वतः चे आर्थिक हित दडले असल्याची धारणा स्पष्ट होत असल्याने नागरी सुविधा पुरविण्यास अपयशी ठरलेल्या मुख्याधिकारी निता अंधारे यांना निलंबित करून अनियमितेचा टपका, असलेले लेखापाल गणेश पगारे,भ्रष्ट कारभाराची पार्श्वभूमी असलेले सहाय्यक नगर रचनाकार सय्यद सलीम यांचा पदभार तात्काळ काढून खातेनिहाय चौकशी करून त्यांना ही निलंबित करण्यात यावे अशी तक्रार देखील आज जिल्हाधिकारी यांचे कडे दिल्याचे गणेश वाघमारे,अँड विकास जोगदंड यांनी सांगितले आहे

# नर्मदेश्वर आले मच्छेद्रगडावर गणपती ,रुखमिनी पांडूरंगासह संत मेळा घेऊन !

**महंत स्वामी जनार्धन महाराज यांचे मार्गदर्शनाखाली मुर्तीप्राणप्रतिष्ठा सोहळा !**

### श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

वै.निगमानंद महाराज यांनी संस्थापक असलेल्या श्रीक्षेत्र मच्छेंद्रगडावर महंत स्वामी जनार्धन महाराज यांचे मार्गदर्शनाखाली नर्मदेश्वर , गणपती, रूखमिनी पांडूरंगासह संत मेळा घेऊन मुर्तीरूपाने स्थिरावले आहेत ,या निमित्ताने श्रीक्षेत्र नारायण गडचे महंत शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसाद होऊन कळशारोहन करून समारोप करण्यात आला .

तीन दिवसीय कार्यक्रमात किर्तन प्रवचनाबरोबर वेदशास्त्र संपन्न महेश महाराज जोशी व ब्रम्हवृंदाच्या मंत्र जयघोषात मुर्तीचा संपुर्ण कुलाचार विधीवत संपन्न झाला .यावेळी शोभायात्रेने एक भक्तिचे चैतन्य गडावर पसरले होते .नर्मदेश्वरासह गणपती रूखमिनी पांडूरंग या देवतेसह संत गोरोबाकाका ,संत धोंडीराम महाराज ,संत महादेव महाराज ,संत सेवालाल यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली तसेच कलशारोहन देखील झाले .महंत स्वामी जनार्धन महाराज यांनी उपस्थित शिवाजी महाराज ,रामेश्वर शास्त्री,उध्दव महाराज ,हनुमान शास्त्री,नवनाथ शास्त्री यांचे संतपुजन करून एकनाथ पठाडे ,महादेव घुंगरड ,नासिकेत जरे ,चंद्रकांत राजहंस ,गोरख खेडकर ,जालिंदर ननवरे ,दिगंबर गायकवाड आदी मान्यवरांचा सत्कार केला .यानिमित्ताने रक्तदान शिबीर देखील घेण्यात आले होते

# टिकणार आरक्षण मिळेल याच आपेक्षेने मराठा समाज सरकारकडे पाहतो - मोनिका राजळे

शेवगांव(प्रशांत बाफना)

नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात शेवगाव - पाथर्डीच्या लोकप्रिय आमदार मोनिकाताई राजळे यांनी मराठा समाजाला टिकणार आरक्षण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांचे सरकार देईल. याच अपेक्षेने महाराष्ट्रातील समाज मोठ्या अपेक्षेने पाहतो असे मतचालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात मराठा समाजाबरोबर इतरही समाजाचे प्रश्न मांडताना आमदार राजळे आपली भूमिका स्पष्ट केली. आंतरवाली सराटी येथून मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेला मराठा आरक्षणाचा लढा व या लढ्याला महाराष्ट्रातील मराठा समाजातील वृद्ध तरुणांसह महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.मराठा आरक्षणाची मागणी योग्य आहे. म्हणूनच या मागणीला सर्वच स्तरातुन चांगला प्रतिसाद मिळत आहे.या आरक्षणामुळे मराठा समाजाला बळ मिळेलव मराठा समाजाची सद्यस्थितीत सुधारेल.

शेवगाव तालुक्यातील विविध विकास कामांची भूमिपूजन व लोकार्पण निमित्त भातकुडगाव फाटा परिसरामध्ये शेवगाव पाथर्डीचे आमदार आमदार मोनिकाताई राजळे आले असता भातकुडगाव फाटा चौफुल्या वरील मराठा आंदोलकाच्या वतीने हिवाळी अधिवेशनात मराठा समाजाचा विषय ताकतीने मांडा अशी आग्रही मांडणी केली होती. त्यानंतर मोनिकाताई यांनी ती मागणी मांडल्यामुळे मराठा आंदोलकांच्या वतीने त्यांचे खूप खुप अभिनंदन

**-शहाराम आगळे**
मराठा आंदोलक

शेवगाव -पाथर्डीच्या लोकप्रिय आमदार मोनिकाताई राजळे यांनी चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात मतदार संघातील सर्व समावेशक प्रश्न उपस्थित केले.व त्याचबरोबर मराठा आरक्षणाचा प्रश्नही त्यांनी मोठ्या ताकतीने मांडल्याबद्दल तालुक्यातून त्यांचे स्वागत होत आहे.

**-संदीप खरड** युवा नेते भाजपा शेवगाव

# तलवार घेऊन दहशत माजवणारे अटकेत



**माजलगाव शहर पोलिसांची कामगिरी**

माजलगाव / प्रतिनिधी - शहरात तलवार घेऊन फिरणारे दोघांना माजलगाव शहर पोलिसांनी अटक केले आहे. खात्रीशीर माहिती मिळालेली होती की परतूर येथे राहणारे बाबुसिग दयासिंग टाक आणि चरणसिंग दया सिंग टाक हे दोघे शहरांमध्ये आले आहे आणि काहीतरी चोरी करण्याचे उद्देशाने फिरत आहे त्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री धीरज कुमार बच्चू यांचे मार्गदर्शनाखाली शितलकुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक, माजलगाव यांनी एक पथक तयार करून शोधासाठी पाठवले. सामान्य नागरिक आणि काही पत्रकार यांची या कामे माहिती मिळवण्यासाठी मोठी मदत झाली. वरील दोघे चिंचगव्हण येथे एके ठिकाणी थांबलेले आहेत असे समजतात त्या ठिकाणी पथकातील स पो नी निलेश इधाते, पोलीस जमादार गणेश तळेकर, राम भंडाणे यांनी छापा मारून त्यातील दायासिंग टाक यास जागीच पकडले आणि त्याच्या ताब्यातून तलवार जप्त करण्यात आली. परंतु दुसरा आरोपी चरणसिंग टाक हा तिथून पळून गेला परंतु आज सकाळी त्यासही अटक करण्यात आली आहे. भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे त्या दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोणी तलवार किंवा गावठी पिस्तूल सोबत बाळगत असल्यास माहिती द्या, माहिती देण्याऱ्यास बक्षीस देण्यात येईल आणि नाव गुप्त ठेवण्यात येईल असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# अधिकार नसताना गोळ्या औषधांची विक्री तालुका अरोग्य अधिकारी डॉ मधुकर घुबडे यांच्या कडुन स्थळ पहाणी

## नित्रुडच्या जनसेवा निसर्गोपचार केंद्राचा दुसऱ्यांदा पंचनामा पण आरोग्य अधिकाऱ्याच्या तपासणीला केराची टोपली


माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यातील खामगाव पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील माजलगाव पासून अवघ्या १७ किलोमीटरच्या अंतरावर असलेल्या नित्रुड येथील जनसेवा निसर्ग उपचार केंद्र येथे सुरू आहे.

डॉ. परवाना नसतांना डॉ.पदवी लावलेले बँनर काढण्यात आले होते.पण तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या तपासणीनंतर ते दोन दिवसांनी बॅनर पुन्हा लावण्यात आले.

माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथे गेल्या अनेक दिवसापासून निसर्गे उपचार केंद्र चालू आहे या ठिकाणी निसर्ग उपचार सोबत अनेक गोळ्या औषध दिले जात आहेत याच्या किंमतीही तस्याच वाढिव आहेत व विकण्याचा अधिकार नसताना गोळ्या औषध विकले जात असल्याचे डॉक्टर टिमच्या निदर्शनास आले आहे.या ठिकाणी पुरुष महिला यांच्यावर समान विलाज केला जातो या निसर्गे उपचार केंद्राचा दुसऱ्यांदा तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या पथकाने पंचनामा केला आहे.

मात्र कुठल्याही कारवाईला न घाबरता या मगरुर डॉक्टरांनी आपला मगरूरीपणा सुरू ठेवला आहे.

माजलगाव तालुक्यातील नित्रुड येथे खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर माजलगाव तेलगाव रस्त्यावर असलेले नित्रुड येथील निसर्गे उपचार केंद्र येथे दररोज शेकडो रुग्ण उपचार घेण्यासाठी हजर असतात या ठिकाणी मोठी गर्दी दररोज पाहायला मिळते या ठिकाणी डॉक्टर पदवी असल्याचे बॅनर लावण्यात आले होते त्याचप्रमाणे येथे असलेले मेडिकल यावर अनेक गोळ्या औषधे विकले जात होते याचा पंचनामा करण्यासाठी माजलगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर मधुकर घुबडे व त्यांची सर्व टीम तहसीलचे नायब तहसीलदार पी.एस .कोटाळे व कर्मचारी यांनी भेट दिली व पंचनामा केला यादरम्यान निसर्गोपचार केंद्रास दुसऱ्यांदा नोटीस देऊन दावाखाना बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या यादरम्यान या बोगस दवाखान्यांमध्ये अनेक प्रकारच्या परवानगी नसताना विकत असलेल्या गोळ्या औषधे याचा पंचणामा करण्यात आला नित्रुड येथील या जनसेवा निसर्गे उपचार केंद्रात त्यांनी डॉक्टर असे नाव लिहिल्याने आढळून आले यापूर्वी त्यांच्यावर दिद्रुड पोलीस स्टेशनमध्ये



दि.६ /०४/ २०२२ रोजी गुन्हा नोंद आहे. हा कोर्ट मॅटर चालू असुन या पंचनामेदरम्यान ओ पी डी रजिस्टर अढळून आले यापुढे दवाखाना चालू करणार नाही असे संबंधित सुभाष राठोड व बाबूराव राठोड या इसमाकडून नोटिस वर लिहून घेण्यात आले.दि.१२/१२/२०२३ रोजी पंचा समक्ष अधिकारी कर्मचारी सदस्य ईतर उपस्थीत नागरिकांच्या समक्ष हा पंचनामा करण्यात आला व राठोड यांना दुसऱ्यांदा नोटीस देण्यात आली आहे. कारवाई काय पण करू द्या मी कुणाच्या बापाला भीत नसतो या मनी प्रमाणे डॉक्टर आपला गोरख धंदा सुरू ठेवला आहे. अशा कुठल्याही कारवाईला मगरूर डॉ. घाबरत नसल्याचे आढळून येत आहे असं परिसरातील लोकांचा म्हणणं आहे

# गंगाधर पुरी या बीडच्या सुपुत्राचा पुण्यात समाजरत्न पुरस्कार देऊन केला गौरव

**प्रतिनिधी ।** बीड

शिववंशिय दशनाम गोसावी समाज संस्थेने गोसावी समाजातील ज्येष्ट समाजसेवक गंगाधर पुरी यांना समाजरत्न पुरस्कार देवुन सन्मानित केले.तसेच जालना येथिल समाजाचे लढवय्ये युवा नेते सुनिल भारती यांना शिववंशिय योद्धा हा पुरस्कार देवुन गौरवण्यात आले.या दोघांचे शिववंशिय समाज संस्था, जिल्हा बीडच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

सांस्कृतीक राजधानी पुणे येथे शिववंशिय समाज संस्थेच्या वतीने नुकताच वधु ,वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला होता.या समारंभात राज्यातील गोसावी समाजाच्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

बीड जिल्यातील ज्येष्ट समाजसेवक,कृतीशिल व्यक्ती तथा शिववंशिय समाज संस्थेचे मराठवाडा कोषाध्यक्ष गंगाधर पुरी यांना समाजरत्न पुरस्कार देवुन गौरवण्यात आले.तसेच जालना येथिल समाजाचे लढवय्ये युवा नेते,शिववंशिय दशनाम गोसावी समाज संस्थेचे मराठवाडा यूवा अध्यक्ष सुनिल भारती यांना शिववंशिय योद्धा हा पुरस्कार देण्यात आला. या दोघांचे बीड जिल्हा शिववंशिय समाज संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात येवुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.





केज मतदारसंघातील नांदुरघाट गटातील खाडेवाडी येथील रस्त्यांचा कामाचा शुभारंभ अक्षय भैय्या मुंदडा यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळेस तालुकाध्यक्ष भगवान केदार,आनंत सारूक, प्रा.सारूक सर ,नितीन बिबवे,कल्याण पवार, पाटील,शिवाजी जाधव, जावेद शेख, संतोष जाधव, सुनील घोळवे, राहुल गदळे,भिसे साहेब, सासवडे मॅडम व सर्व मान्यवर.

# ठाकरे शिवसेनेचा राजकिय यु टर्न का?

## महाराष्ट्राला दिल्लीश्वरासमोर झुकवताना पंतप्रधान पदासाठी पवारांचं नाव न घेता खरगेंचे नाव सुचवले

केवळ मुख्यमंत्री पदासाठी भाजपासोबत युती तोडल्यानंतर ठाकरे शिवसेना भांबावल्यासारखी राजकिय भुमिका कशा प्रकारे घेवु लागली?हे समोर आलं. राज्यात सत्तेवर असताना राष्ट्रीय स्तरावर युपीएचं नेतृत्व शरद पवारांनी करावं एवढेच नव्हे तर पंतप्रधान पदाची ते उमेदवार करण्याची मागणी खा.संजय राऊतांनी जाहिरपणे बोलुन दाखवलेली होती. राजकिय समीकरण बदलले पवारांची राज्यात ताकद कमी झाली. त्या पार्श्वभुमीवर मात्र पुन्हा ठाकरे शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी राजकिय यु टर्न घेत काल दिल्लीत पार पडलेल्या इंडी बैठकीत पवारांच्या नावाचा साधा उल्लेख न करणे म्हणजे महाराष्ट्राला दिल्लीश्वरासमोर झुकवल्यासारखंच म्हणावे लागेल. त्या बैठकीतली दुसरी बाजु म्हणजे मल्लिकार्जुन खरगे पंतप्रधानाचा चेहरा होण्यासाठी तयार नाहीत याचाच अर्थ देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी २०२४ नंतर हॅटट्रिक करणार त्यांच्यासमोर आपला निभाव लागणार नाही हे लक्षात आल्याने इंडी बैठकीत खरगेंचे पायाला थरकाप झाला. नव्हे तर घाबरले म्हणावे लागेल. परिणाम चेहरा होण्यासाठी नकार दिला.

पंतप्रधान मोदी यांना आगामी लोकसभा निवडणुकीत विरोध करण्यासाठी देशाच्या राजकारणातले जवळपास २७ पक्ष एकत्र येवु पहातात. बेंगलोर,मुंबईच्या बैठका कशाबशा घेतल्या. पंधरा दिवसापुर्वी दिल्लीत तिसरी बैठक होणार होती. त्याला अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, केजरीवाल आदींनी अनुपस्थिती दाखवली. तेव्हा रद्द झालेली बैठक काल पार पडली. देशात तिसया बैठकीपर्यंत राजकिय समीकरण बदलुन गेल्याचे सर्वांनी मान्य केलं. नुकत्याच पाच राज्यात विधानसभा निवडणुका पार पडल्या. राजस्थान, मध्यप्रदेश,छत्तीसगड १०० टक्यांनी कमळ फुलले. इंडिया बैठकीत सहभागी असलेल्या कोणत्याही पक्ष नेतृत्वाला एवढा दारूण पराभव राजस्थान, मध्यप्रदेशमध्ये होईल असं वाटलच नाही. कारण राजस्थानमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता होती. आत्मविश्वास मोठा होता. पण तिथेही काँग्रेसमुक्त राजस्थान झाला. मध्यप्रदेशात मिळालेले यश अभुतपुर्व म्हणावे लागेल. काँग्रेसनं माध्यमाच्या आडुन तर्कवितर्क बांधले होते. जणुकाही मध्यप्रदेशात आम्ही सत्तेवर आलो या आविर्भावात निवडणुक लढवली. पण मोदी नेतृत्वाचा वारू या राज्यासह छत्तीसगडमध्ये देखील कुणीच रोखु शकले नाही. निवडणुक पुर्व रंगात इंडी आघाडीने विजयाचे उसणं अवसान आणले होतं पण प्रत्यक्षात घडले ते वेगळे. त्यानंतर कालची बैठक दिल्लीत होताना इंडियाच्या प्रत्येक नेत्याची चेहरं सुकलेली होती. कारण कुठल्याही राज्यात भाजपला पराभव त्यांना करता आला नाही. या बैठकीसाठी राज्यातुन उद्धव ठाकरे, शरद पवार, संजय राऊतांची उपस्थिती होती. वेगवेगळ्या प्रश्नावर बैठकीत झालेली चर्चा पुढे आली. मग जागावाटप असेल किंवा संभाव्य सभा कुठल्या राज्यात घ्यायच्या कशा प्रकारे मोदींना विरोध करायचा? याची रचनात्मक कार्यपद्धती सिद्ध झाली असावी. या बैठकीतलं वैशिष्टए म्हणजे पंतप्रधान पदासाठी उमेदवार म्हणुन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचं नाव पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सुचविले. खरं तर तिसयाच बैठकीत पंतप्रधान पदाचा चेहरा सुचवण्याची घाई ममता दिदी आणि केजरीवाल यांना का झाली असावी? याचं राजकिय संशोधन जर केलं तर कदाचित शरद पवारांचं नाव कुणी तरी पुढे येईल आणि ते बॅनर्जींना मान्य नव्हतं. म्हणुन त्यांनी उतावीळ स्वभावाप्रमाणे नाव सुचवुन टाकले.

**मल्लिकार्जुन खरगे का घाबरले?**

इंडि बैठकीत पंतप्रधान पदासाठी खरगेंचं नाव सुचवल्यानंतर त्यांच्या पायाला बैठकीतच थरकाप उडाला असावा. कारण त्यांनी अगोदर निवडणुक जिंकण्याचे बघु, मग नावाचा विचार करू अशी भुमिका घेतली. खरं तर पंतप्रधान पदासाठी नाव आल्यानंतर छाती फुगवुन खरगेंनी सहमती द्यायला हरकत नव्हती. फार मोठी संधी त्यांना बैठकीत चालुन आल्यानंतर नको म्हणाले. याचा दुसरा अर्थ असा की २०२४ नंतर देशाच्या राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी राजकियदृष्टए हॅटट्रिक करणार जागा म्हटलं तर ४०० पार होणार. त्यांच्यासमोर आपला निभाव लागणार नाही लक्षात आल्याबरोबर त्यांनी तात्पुरत्या नावाने खुर्चीवर बसायला सहमती दिली नाही. कारण खरगे हे देशाच्या राजकारणातील जुने जाणते अनुभवी वरिष्ठ नेते असुन राजकिय कल त्यांना चांगला ओळखता येवु शकतो. ते भविष्य ओळखुन त्यांनी कदाचित पंतप्रधान पदाचा चेंडू पदरात घेतला नाही. एवढेच नाही तर ते घाबरले असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही. जागा वाटप किंवा पंतप्रधानाचा चेहरा कदाचित आगामी काळात होणाया बैठकीत जाहिर होईल तो भाग वेगळा पण आज खरगे घाबरले हे निश्चितच.

महाविकास आघाडी राज्यात सत्तेवर असताना मुख्यमंत्री पदी उद्धव ठाकरे होते. वास्तविक पहाता २०१९ ला मतदारांनी जनाधार भाजप-शिवसेना महायुतीला दिला होता. पण केवळ मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीसाठी तत्कालीन काळात शिवसेनेने भाजपला धोका देत बाजुला ठेवले. शरद पवारांना सोबत घेत काँग्रेस सोबत महाविकास आघाडी सत्तेत आली. तब्बल अडीच वर्षे कारभार उद्धव ठाकरेंनी केला. हा इतिहास आणि त्यातली गंमत सांगायचं झालं तर २०२०-२१ मध्ये आजच्या ठाकरे शिवसेनेने खा.संजय राऊतांच्या माध्यमातुन म्हटलं होतं की देशाचं युपीए अध्यक्ष शरद पवारांनी स्विकारावं नव्हे तर पवार साहेब पंतप्रधान पदाचे उमेदवार असु शकतात. एवढं जाहिर बोलुन तशा प्रकारची मागणी करून देखील कालच्या बैठकीत पवारांच्या नावाचा उल्लेख जिथे उद्धव ठाकरे स्वत: उपस्थित असताना केला नाही. खया अर्थाने खेदाची बाब म्हणावी लागेल. त्या बैठकीत पंतप्रधान पदाचा चेहरा म्हणुन शरदचंद्र पवारांचं नाव ठाकरे किंवा संजय राऊतांनी जरी घेतलं असतं तरी महाराष्ट्रातील जनतेचा स्वाभिमान दाटुन आला असता.पण केवळ सत्तेसाठी लाचारी करायची आणि विरोधकांना विरोध करायचा म्हणुन नको त्या पंगतीला जावुन बसल्यानंतर समोर जी वाढ आली ते स्विकारायचं या भुमिकेत काल उद्धव ठाकरे दिसुन आले. राज्यातल्या शिंदे-फडणवीस-पवार सरकारला संजय राऊत नेहमीच दिल्लीला का गेले? महाराष्ट्र दिल्लीसमोर गहाण ठेवला? असं म्हणत हिणवतात. मग कालच्या इंडिया बैठकीत याच मंडळींनी महाराष्ट्र राष्ट्रीय काँग्रेस अर्थात सोनिया दिल्लीश्वरासमोर गहाण खत लिहुन ठेवताना त्यांना काही कसं वाटलं नाही? हा प्रश्न आता जनतेला पडला. एका बैठकीत खरगेंच्या नावाला डोलदार मानं हालवत सहमती देवुन ही मंडळी परतली. तिथे मग महाराष्ट्राचा स्वाभिमान का गहाण ठेवला? साधं युपीए समन्वयक म्हणुन देखील पवारांच्या नावाचा उच्चार ही मंडळी करू शकली नाही. ममता दिदी यांनी सुचवलेल्या नावाला सहमती देवुन हे परतले. राजकिय समीकरण बदलल्यानंतर कशा प्रकारे यु टर्न देशाच्या राजकारणात ठाकरे शिवसेनेने घेतला हे कालच्या इंडी बैठकीतुन कळुन चुकलं. हे नेमकं का केलं? त्यामागे देखील इतिहास असुन राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी पक्ष फुटला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार बाहेर पडून सत्ताधायासोबत आले. एवढेच नव्हे तब्बल ४० आमदार बाहेर पडल्याने राजकियदृष्टए पवारांची अवस्था महाभारतात शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यासारखी झाली. हे लक्षात येताच उद्धव ठाकरे संजय राऊतांनी दिल्लीत जावुन भुमिका बदलली. त्यांच्या तोंडाला पवारांचे नाव आलेच नाही. कदाचित राज्याच्या राजकारणात देखील मोठए साहेबांसोबत राहतील का नाही? भविष्यकाळ ठरवेल.इतिहासाची आठवण खा.संजय राऊतांनी करून देण्यासाठी लिहिण्याचा एवढा खटाटोप.बस्स.

-राम कुलकर्णी,
भाजप राज्य प्रवक्ता

# पुरूषोत्तमपुरी येथे चार ठिकाणी चोरी
# गळ्याला चाकू लावून फिल्मी स्टाईलने चोरी

पुरूषोत्तमपुरी /सुनिल थोरात

पुरुषोत्तमपुरी येथे दि.१७ च्या रात्री चार ठिकाणी चोरीचे प्रकरण घडले यामध्ये चोरांनी सोने आणि मुद्देमाल लंपास केला. पहिली चोरी बाबासाहेब संतोबा थोरात यांच्या घरी झाली. ज्या रुममध्ये चोरी झाली त्या रूममध्ये कापूस असल्यामुळे त्या रूमला कुलूप लावून दुसऱ्या रूममध्ये झोपले होते. त्या रूमचे दरवाजाचे कुलूप तोडून कपाटातील १० ग्राम सोने चांदीचे चार आकडे आणि १००००० लाख रुपये रक्कम पळविली. तर दुसरी चोरी गंगुबाई थोरात यांच्या घरी झाली गंगुबाई यांचे मुले ऊसतोडणी साठी बाहेर गेलेले आहेत सध्या त्यांच्या घरी त्या व त्यांच्या मुलांच्या मुली घरी होत्या. त्यांच्या घरात घुसून त्यांना व त्यांच्या नातीला आणि सहा महिन्यांच्या बाळाला चाकू गळ्याला लावून पैसे आणि दागिने द्या नाहीतर तुम्हाला मारून टाकू अशी धमकी देत होते तर गंगुबाई थोरात या आरडाओरड करत होत्या त्यांना गप्प बसा नाहीतर बाळाला मारून टाकू अशा धमक्या देत होते या झटापटीत यांच्या गळ्याला चाकू लागून त्यांना जखम झाली आहे त्यांच्या गळ्यातील ४ ग्राम ची पोत आणि त्यांच्या नातीची ९ ग्रामचे गंठन व ६ ग्रामचे मंगळसूत्र व ६ ग्रामचे झुंबर जोड व १५००० हजार रूपये पळवले तर तिसऱ्या ठिकाणी अर्जुन थोरात हे घरात साप निघाल्यामुळे त्यांच्या दुसऱ्या मुलाच्या घरी घराला कुलूप लावून झोपायला गेले होते यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून घरातील ९००० हजार रुपये व १ ग्रामचा ओम आणि चांदीची साखळी पळविली तर चौथ्या ठिकाणी तुकाराम सवणे यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडताना त्यांच्या पत्नीला जाग आल्यामुळे त्यांनी आरडाओरड केली तीथे चोरांच्या हाती काही लागले नाही.या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली असून त्यांनी बीडचे श्वानपथक व फिंगरप्रिंट चे पथक बोलावले होते त्यांनी काही पुरावे जमा करून तपासणी केली आहे. सदरील प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत आहे.

# औद्योगिक विकासावर लक्ष
# कोण वेधणार ?दत्ता वाकसे

## दत्ता वाकसे यांचा आमदारांना सवाल : हिवाळी अधिवेशनात जनप्रतिनिधींच्या हालचालींवर डोहाळे

बीड/प्रतिनिधी

७ डिसेंबरपासून नागपूर येथे राज्य सरकारचे हिवाळी अधिवेशन सुरू झाल आहे. अधिवेशनाला आज १० दिवस झाले असले तरी नेमके पाच ते सहा दिवस कामकाज झाले आहे. त्यातही मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील समस्यांवर किंबहुना प्रश्नांवर चर्चा झालेली नाही. जिल्ह्यात रोजगाराची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र फलकापुरतेच ठरू लागले आहेत. मात्र हिवाळी अधिवेशनात जनप्रतिनिधीकडून एकाही औद्योगिक विकासाकडे सरकारचे लक्ष वेधण्यात आले नाही. यामुळे जिल्ह्यातील जनप्रतिनिधींच्या हालचालीवर युवकांचे लक्ष लागले आहे. बीड जिल्हा राज्याच्या टोकावरचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात शेती व्यवसायाशिवाय रोजगाराचे कुठलेही साधन सुविधा नाही. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांसह कुशल, अकुशल मजुरांना रोजगाराच्या शोधात परप्रांतात व महानगरात ऊसतोडणीसाठी जावे लागते. बीड जिल्ह्यात शासनाच्या दप्तरी ११पैकी सहा तालुक्यात औद्योगिक विकास महामंडळाच्या आद्योगिक क्षेत्राची नोंद आहे. मात्र फलकापुरतेच औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे दिवसेंदिवस बीड जिल्ह्यात रोजगाराचा प्रश्न गंभीर होत चालला मात्र एकाही आमदारांनी लक्ष वेधले नाही औद्योगिक विकासावर लक्ष कोण वेधणार ?शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांचा सवाल बीड जिल्ह्यातील सर्वच आमदारांना केला आहे. हिवाळी अधिवेशन होत असतानाही या अधिवेशनात एकाही जनप्रतिनिधीकडून आद्योगिक विकासावर सरकारचे लक्ष वेधण्यात आले नाही. किंबहुना राज्य सरकारने देखील बीड जिल्ह्यातील प्रलंबित समस्या व ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करण्याचे औदार्य दाखविले नाही. हिवाळी अधिवेशनाला आज दहा दिवस लोटले आहेत. यातील चार दिवस सुट्टीचे वगळले असता सात दिवसांपैकी एक दिवस थातूरमातूर प्रश्नावर गेला. तर उर्वरित दिवस आरक्षण, व इतर विषयावर.या अधिवेशनाचे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे या अधिवेशनात बीड जिल्ह्यातील जनप्रतिनिधी अधिवेशनाच्या राहिलेल्या उर्वरित दिवसांमध्ये औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर सरकारचे लक्ष वेधणार काय ?असा सवाल बीड जिल्ह्यातील सर्व आमदारांना शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केला आहे



काळेगाव घाट येथील बस स्टँड जवळील १.५० कोटी रकमेच्या पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन आ नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी उपस्थित श्री ऋषीकेश भैया आडसकर, ता. अध्यक्ष भगवान केदार, शरद इंगळे,सुनिल आबा गलांडे, गाताडे गुरूजी, सुनिल घोळवे, शिवराम घुले, सचिन सिरसट, सुधीर शिंदे, संतोष देशमुख, जलिंदर गव्हाणे अश्रुबा शिरसाट, अरुण तात्या काळे, अविनाश साबळे व सार्वजिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी .

# कनकालेश्वर विद्यालयात गाडगे बाबा पुण्यतिथी उत्सहात साजरी

रयत शिक्षण संस्थेची कनकालेश्वर विद्यालय बीड मध्ये थोर समाजसेवक संत गाडगेबाबा महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री अंबादासजी शेकडे सर हे होते. विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून संत गाडगेबाबा यांचे स्वच्छता विषयी तथा अंधश्रद्धा निर्मूलन संदर्भातील अनेक कामे आपल्या मनोगतातून सांगितली. कु. जाधव अक्षरा, काळे रेणुका, कोरडे प्रज्ञा, कळसकर सोनाली,खान सायमा यांचे मनोगते झाली तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्री. शिवाजी आगे यांनी आपल्या मनोगतातून संत गाडगे बाबांची माणसात देव शोधणारी शिकवण स्पष्ट केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. शेकडेसाहेबांनी संत गाडगे बाबांनी गावोगावी जाऊन गावे स्वच्छ केली आपण आले शरीर, घर, शाळा स्वच्छ ठेवण्यासाठी





पयत्नशील राहू अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे गजानन तर अध्यक्ष सूचना कु. आडणे सोनाली, अनुमोदन- गायकवाड अनंता, आभार प्रदर्शन राऊत ऋतुजा हिने केले. कार्यक्रमासाठी श्री. वीरेंद्र जाधव सर श्री सुरेश पतंगे सर, रामचंद्र मोराळे सर, श्री. ढाकणे सर, श्रीमती शहाणे मॅडम, श्रीमती माने मॅडम,श्रीमती साळुंखे मॅडम श्रीमती सानप मॅडम, श्री. सुधाकर मामा उपस्थित होते.

# मराठ्यांची एकजूट झुंडशाही नव्हे..!

## मनोज जरांगे पाटील समाज मान्य नेतृत्व - राजेंद्र मस्के

**बीड/ प्रतिनिधी**

**गेली चाळीस वर्षापासून मराठा आरक्षण लढा चालू आहे. या लढ्यात कै. अण्णासाहेब पाटील, स्व. विनायकराव मेटे यांच्यासह अनेकांनी योगदान दिले. मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता मराठा समाजातील तरुण पिढीच्या भवितव्या साठी हा लढा लोकशाही मार्गाने तीव्र केला. इमानदारीच्या संघर्षाला कौल देऊन राज्यातील सकल मराठा त्यांच्या पाठीशी तन मन धनाने उभा आहे. मराठा महिला, पुरुष प्रत्येक सभेत लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून खंबीरपणे समर्थन देतो आहे. समाजाचा नेता कोण असावा हे ठरवण्याचा अधिकार समाजाला आहे. इतरांनी त्यात लुडबुड करू नये. मनोज जरांगे पाटील हे समाजमान्य नेतृत्व असून, यांच्या नेतृत्वाखाली तमाम मराठा एकजूट झाला. या एकजुटीला कोणी झुंडशाही म्हणत असेल तर, ही बाब खेदाची असुन मराठा समाजाची अवहेलना करणारी आहे. याचे भान ठेवले पाहिजे. अशी प्रतिक्रिया राजेंद्र मस्के यांनी पिंपळनेर येथील मराठा समाजाच्या संवाद बैठकी दरम्यान व्यक्त केली.**

मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी राज्य सरकारला दिलेली मुदत २४ डिसेंबर २०२३ रोजी संपत असून, अजून सरकारने कोणताही आश्वासक निर्णय घेतलेला नाही. यामुळे मराठा समाजात प्रचंड संभ्रम व असंतोष आहे. सरकारकडून सकारात्मक निर्णय आला नाही तर पुढे लढ्याची दिशा काय असेल या संदर्भात बीड येथे २३ डिसेंबर २०२३ रोजी दुपारी ०२.०० वा. पाटील मैदान येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची इशारा सभा आयोजित केली आहे. या सभेच्या अनुषंगाने पूर्व तयारीसाठी पिंपळनेर सर्कलची मराठा समाजाची संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. परिसरातील मराठा उत्स्फूर्तपणे उपस्थित राहिल्याने बैठकीला सभेचे स्वरूप प्राप्त झाले. या बैठकीसाठी राजेंद्र मस्के, अशोकराव हिंगे, बी.बी जाधव, मंगेश पोकळे, परमेश्वर सातपुते, सुनील सुरवसे, गणपत डोईफोडे, दुष्यंत डोंगरे, जयदत्त थोटे, मनोज पाटील, विलास सातपुते, बद्रीनाथ जटाळ आदिसह मराठा बांधव बहुसंखेने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन सर्वांगीण विकास साधावा- प्राचार्य डॉ.संतोष उंदरे

## बलभीम महाविद्यालयात आयोजित संगणक प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात प्रतिपादन

बीड (प्रतिनिधी)

शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासासोबतच आजच्या काळाची गरज ओळखून नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे असून विशेषत: संगणकाचे कौशल्ये स्वत:मध्ये विकसित करून आपला सर्वांगीण विकास साधावा असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांनी केले.

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी दि. १९ व २० डिसेंबर या दोनदिवसीय 'संगणक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ डिसेंबर रोजी या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते अध्यक्षीय मार्गदर्शनात बोलत होते. मंचावर उद्घाटक म्हणून उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. महादेव साखरे, खंडेश्वरी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. व्ही. डी. कोल्हे, राजर्षी शाहू विद्यालयातील सहशिक्षक दिपक सरवदे यांची उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे याप्रसंगी आपल्या



मार्गदर्शनात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी भाषेची कौशल्ये आत्मसात करावी यासोबतच नवीन तंत्रज्ञानावरही भर दिला पाहिजे. या दोनदिवसीय कार्यशाळेत संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक शालेय विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख तसेच संगणकाच्या सहाय्याने करता येणारी विविध कार्य याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत. या समारंभाच्या प्रास्ताविकातून संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. महादेव साखरे यांनी कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. सूत्रसंचालन प्रा. सुहास काळे यांनी केले तर आभार डॉ. मयुर देशमुख यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. सुहास काळे, डॉ. एस.व्ही. पोटे, जी.व्ही. शिंदे, यु.आर. चांदणे, एम.एच.शेख, सिमा नाईकनवरे, रूपाली गायकवाड यांच्यासह खंडेश्वरी व राजर्षी शाहू विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# अश्लील शिक्षक आमेर काझीला तात्काळ अटक करा

## मिल्लिया अश्लील व्हिडिओ प्रकरणाची सी.आय.डी मार्फत चौकशी करा

### मुस्लिम समाजाचे पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन

बीड / प्रतिनिधी

येथील मिलिया मुलांची माध्यमिक शाळेतील सध्या निलंबित शिक्षक व अश्लील व्हिडिओ प्रकरणातील प्रमुख आरोपी अश्लील शिक्षक आमेर काझी याला तात्काळ अटक करून मिल्लिया अश्लील व्हिडिओ प्रकरणाची सी.आय.डी मार्फत चौकशी करा अशी मागणी आज अप्पर पोलीस अधीक्षक सचिन सुरेश पांडकर यांना मुस्लिम समाजाचे वतीने दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

असे की,जिल्ह्याभरात अल्पसंख्याक उर्दू शिक्षणाचे केंद्र मानल्या जाणाऱ्या बीड शहरातील किल्ला मैदान स्थित अंजुमन इशात-ए-तालीम या शैक्षणिक संस्थेमार्फत जिल्हाभरात अनेक प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय चालविल्या जातात या संस्थेचे अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान आहे. पण गेल्या काही महिन्यापासून सदरील संस्थेच्या शाळेमध्ये अश्लील व्हिडिओ चित्रफित केल्याचे प्रकरण समोर आले आहे.

मिल्लीया मुलांची माध्यमिक शाळेत सध्या निलंबित असलेला आमेर रफात कझी नावाच्या शिक्षकाने शाळेच्या परिसरात व वर्ग खोल्यात शाळेतील इतर महिला शिक्षिकांसोबत अश्लील व्हिडिओ चित्रफित केल्याचं धक्कादायक प्रकार समोर आले असून याप्रकरणी आमेर रफत काझी व इतर महिला शिक्षकांविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात दि. ०९/१२/२०२३ रोजी गुन्हा दाखल झाला असून या प्रकरणे आमेर रफत काझी व इतर आरोपींना अद्याप अटक न झाल्याने पोलीसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

अश्लील व्हिडिओमध्ये संबंधित महिला शिक्षकांनी पवित्र हिजाब, बोबरखामध्ये शाळेच्या परिसरात अश्लील कृत्य केल्याने आमच्या धार्मिक भावना दुखायला गेले असून गुन्हा दाखल करता वेळेस धार्मिक भावना दुखवल्याची कलम दाखल झाली नसून ती कलम वाढविण्यात यावी.

अश्लील शिक्षक आमेर काझी हा अश्लील कृत्य करत असताना व्हिडिओ का करायचा ? सदरील व्हिडिओ हे अश्लील संकेतस्थळावर विकले आहे का ? याचे परदेशात काही कनेक्शन आहे का ? अश्लील व्हिडिओ प्रकरणात संस्थाचालक व शाळा प्रशासनने संबंधित महिला व पुरुष शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यास उशीर का लावला ? या प्रकरणी आणखी कीती शिक्षक सहभागी आहे ? असे अनेक प्रश्न आहेत जे उघडकीस आणण्यासाठी याप्रकरणी उखऊ मार्फत चौकशी होणे गरजेचे आहे.

तरी मेहेरबान साहेबांना विनंती करण्यात येते की वरील अश्लील व्हिडिओ प्रकरणी आमेर रफत काझी



व इतर अरोपीना अटक करुन मिल्लिया अश्लील व्हिडिओ प्रकरणाची क्राईम इव्हेंस्टीगेशन डिपार्टमेंट म्हणजे उखऊ मार्फत चौकशी करण्यात यावी अन्यथा येणाऱ्या काळात जिल्हाधिकारी कार्यालया समोर लोकशाही मार्गाने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल अशा आशयाचे निवेदन शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक सचिन सुरेश वाडकर साहेब यांना देण्यात आले. व त्याची प्रत वरिष्ठ अधिकाऱ्यांना पोच करण्यात आली यावेळी पठाण मोहब्बत खान,शकील खान बिल्डर,शेख युसुफ,शेख इफ्तेखर,शेख पशा भाई,सय्यद जाहेद,हमीद खान उर्फ बाबा खान,पठाण अमर जान सह इतर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी गणेश उबाळे यांची निवड

प्रतिनिधी(बीड)

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी भेंड खुर्द येथील गणेश उबाळे यांची नियुक्ती करण्यात आली. गणेश उबाळे हे मागील चार वर्षापासून युवक काँग्रेस च्या माध्यमातून महाराष्ट्र भर काम करत आहेत. त्यांनी २०२१ साली झालेली युवक काँग्रेस ची निवडणूकही लढवली होती आणि महाराष्ट्र भरातून तब्बल ५३०० मतदान घेतले होते. राहूल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेत सहभागी होऊन राहूलजी गांधी यांची भेट घेतली होती. युवक काँग्रेस हीच महाराष्ट्राला नवी दिशा देऊ शकते आणि महाराष्ट्रातील युवकांचे प्रश्न सोडवू शकते असं मत गणेश यांनी व्यक्त केले. भेंड खुर्द सारख्या ग्रामीण भागातून येत युवक काँग्रेस मध्ये आपलं स्थान कामाच्या जोरावर संघटनेत ओळख निर्माण केली आहे. गणेश सारख्या



तरुण कार्यकर्ता मुळे काँग्रेस पक्षाला गेवराई तालुक्यात ताकत मिळू शकते. सदर नियुक्तीची सर्व स्तरातून जोरदार कौतुक आणि अभिनंदन होत आहे. कॉग्रेस पक्षाला बीड बरोबरच महाराष्ट्र भर बळकट करण्यासाठी आगामी काळात काम करू अशी गणेश उबाळे यांनी भावना व्यक्त केली.




वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई व द युनिक अकॅडमी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या केज मतदार संघातील सर्व विद्यार्थ्यांसाठी भव्य मोफत करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मा.आ.सौ.नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या हस्ते संपन्न झाले.आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे संपन्न झालेल्या या शिबिरात करिअर मार्गदर्शक, प्रेरणादायी वक्ते, द युनिक अकॅडमी, पुणे प्रा. दिनेश ताठे सर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

मित्रांनो,

आज आपण पाहणार आहोत ग्रामसभा किती घेतल्या पाहिजे

ती सभा घेण्या अगोदर काय तयारी केली पाहिजे. ग्रामपंचायत कायदा कलम ७ नुसार ग्रामसभा घेतल्या जातात.९ जून २०२१ शासन निर्णय नुसार २६ जानेवारी,मे, ऑगस्ट, नोव्हेंबर मध्ये ग्रामसभा घ्यायला पाहिजे.ग्रामसभा बोलवण्याचे कर्तव्य सरपंचाचे आहे. सरपंचाच्या अनुपस्थित उपसरपंच ग्रामसभा बोलू शकतात.सरपंच आणि उपसरपंच दोघेही ग्रामसभा बोलवत नसतील तर ग्रामसेवक यांनी ती सभा बोलवायची आहे ते त्यांचे कर्तव्य आहे.

ग्रामसभे पूर्वी काही तयारी करावी लागते म्हणजेच सात दिवस आधी नोटीस सार्वजनिक ठिकाणी लावायची असते.गावातील जे कोणी शासकीय कर्मचारी असतील त्यांना देखील त्या ग्रामसभेमध्ये उपस्थित राहण्यासाठी नोटीस द्यायची आहे.



शासकीय कर्मचाऱ्यांना ग्रामसभेमध्ये उपस्थित राहणे सक्तीचे आहे.

ग्रामसभेमध्ये शासकीय कर्मचारी जर उपस्थित राहत नसतील तर त्या ग्रामसभेने त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाला कळवणे आवश्यक आहे.

*तहसील प्रशासन प्रतिनिधी
*कृषी विभाग प्रतिनिधी
*आरोग्य विभाग प्रतिनिधी
*पोलीस प्रशासन प्रतिनिधी
*बांधकाम व पाणीपुरवठा विभाग प्रतिनिधी
*अभियांत्रिक विभाग प्रतिनिधी
*जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रतिनिधी
*वि.वि कार्यकारी सो.सा चेअरमन व सर्व सभासद
*तंटामुक्ती अध्यक्ष ,पोलीस पाटील अध्यक्ष, सर्व सदस्य
*अंगणवाडी सेविका व मदतनीस.

सर्व शासकीय निमशासकीय अधिकारी ,पदाधिकारी

अशा पद्धतीने ग्रामसभा घेतल्या पाहिजेत.

ग्रामसभेपूर्वी महिलांची ग्रामसभा झाली पाहिजे. ग्रामपंचायत सदस्य आहेत त्यांनी त्यांच्या वार्डामध्ये वार्ड सभा घेतल्या पाहिजेत.

मित्रांनो आपल्या गावातही अशा पद्धतीने ग्रामसभा होतात का पहा.

आपलाच.

अभिषेक बाळनाथ अडागळे



बीड शहराजवळ असलेल्या कोल्हारवाडी फाटा येथील श्री. क्षेत्र अवधुत दत्त देवस्थान येथे सुरू असलेल्या १४ व्या भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् गुरुचरित्र पारायण व दत्त जन्मोत्सव सोहळ्यास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली. तसेच रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांच्याशीही संवाद साधला. यावेळी दत्त उपासक श्री.ह.भ.प. श्रीहरी महाराज पवार यांनी स्वागत केले.



आपल्या बीड जिल्ह्यातील रस्त्यांच्या विकास कामांसंदर्भात आज केंद्रीय रस्तेविकास मंत्री आदरणीय श्री.नितीन जी गडकरी साहेब यांची त्यांच्या दिल्लीतील कार्यालयात भेट घेतली.

बीड आणि लातूर जिल्ह्याला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब या रस्त्याचे अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव पर्यंत चौपदरीकरण करण्यात यावे आणि सदरील कामाचा समावेश रस्ते विकास मंत्रालयाच्या वार्षिक नियोजनात करण्यात यावा अशी मागणी यावेळी गडकरी साहेबांकडे केली.मा.मंत्री महोदयांनी देखील माझ्या मागणीची दखल घेऊन सदरील कामाचा मंत्रालयाच्या वार्षिक नियोजनात समावेश करण्याचा विश्वास दिला. दरम्यान परळी तालुक्यातील सिरसाळा-पोहनेर या रस्त्याच्या कामाला केंद्रीय रस्ते निधीतून मंजूर दिल्याबद्दल यावेळी त्यांचे आभार मानले.




# एकल महिला संघटना वतीने उमरद खालसा येथे महिला हिंसाचार विरोधात संवाद यात्रा

अंबाजोगाई (वार्ताहर) दिनांक १८/१२/२०२३ रोजी बीड तालुक्यातील उमरद खालसा येथे एकल महिला संघटना च्या वतीने भव्य रॅली चे नियोजन करण्यात आले होते. संवाद रॅली काढण्यात आली. या ठिकाणी यावेळी जि प क्षीरसागर सर यांनी सूत्रसंचालन केले तर रुक्मिणी नागापुरे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले

तसेच पिंपळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अर्जुन गोलवाल साहेब, सरपंच गणेश घोडे सर , ग्रामपंचायत सदस्या वछला कापसे, सुमित्रा जाधव ताई, महिला सदस्य, माजी सरपंच सौ शकुंतला प्रभाळे, मिथुन जोगदंड सरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात केली. साहाय्यक पोलीस निरीक्षक मा. अर्जुन गोलवाल साहेब व सामाजिक कार्यकर्ते मिथुन जोगदंड यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच ग्रामपंचायत सदस्य सरपंच,शाळेतील प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका, यांचे सहकार्य लाभले. महिला, मुली, विद्यार्थी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते यावेळी जि प प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जोशी सर, श्रीमती गवते मॅडम, श्रीमती वाघमारे मॅडम, श्रीमती चोपडे मॅडम, पवार मॅडम, सावंत मॅडम, सुरवसे सर, क्षीरसागर सर ,एकल महिला संघटना च्या रुक्मिणी नागापुरे, रेश्मा सोनवणे, कौशल्या जाधव,मनीषा थोरात, मदलसा होळकर, माधुरी प्रभाळे, सुनीता सोनवणे, प्रियंका थोरात, माया सोनवणे, वंदना वाघमारे, सोयम प्रभाळे , सतीश सोनवणे, शरद वाघमारे, सोनवणे सर, व मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले.



# केज तालुक्यातील येवता येथेमार्तंड खंडोबा यात्रे निमित्त गाड्या ओढण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील येवता येथे मार्तंड खंडोबा यात्रे निमित्त गाड्या ओढण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.प्रत्येक वर्षा प्रमाणे याही वर्षी येवता गावातील ग्रामदैवत मार्तंड खंडोबा यात्रेस रविवार दि.१७ डिसेंबरपासून प्रारंभ झाला असून ग्रामस्थांनी विविध कार्यक्रमांचीजय्यत तयारी केली.गावात ग्राम स्वच्छता रस्ते साफसफाई करून यात्रेकरूंच्या स्वागताची तयारी केली आहे.भाविकांनीयेळकोट येळकोट

जय मल्हार घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमुले होते.केज तालुक्यातील येवता येथे यात्रे निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रविवार दि १७ रोजी सायंकाळीह.भ.प.लक्ष्मण पांडुरंग इनामदार (गुरुजी) यांच्या अमृततुल्य कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यातआला होता.तर सोमवाररोजी सकाळी ९-०० वाजता लंगर तोडण्याचा कार्यक्रम संपन्न झाला व दुपारी बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम सुरू झाला या गाड्या ओढण्यासाठी सात भाविक गेल्या पाच दिवसापासुन मार्तंड खंडोबा मंदिरात उपवास करून मंदिरामध्ये बसले होते.गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला हा कार्यक्रम पाहण्यासाठी गावातील व परिसरातील नागरिक यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# ग्रामपंचायतींचे तीन दिवस काम बंद आंदोलन राहणार

किल्ले धारूर / प्रतिनिधी

सरपंच ग्रामरोजगार सेवक ऑपरेटर ग्रामसेवक हे जाणार संपावर जिल्ह्यातील सरपंच उपसरपंच ग्रामरोजगार सेवकाच्या मानधनात वाढ करण्यात यावी या सही इतर मागणीसाठी बेमुदत आंदोलन सुरू आहे, ग्रामपंचायत सदस्यांचा भत्ता सरपंच उपसरपंच थकीत मानतात काळात करण्यात यावी यास इतर मागण्या साठी जिल्ह्यातील सरपंच ग्राम रोजगार सेवक ग्रामसेवक ऑपरेटर बेमुदत संपावर गेले आहेत, तालुक्यातील ग्रामसेवक ग्राम रोजगार सेवकांना पंचायत समिती आंदोलन केले यामुळे अनेकांची काम रखडले आहेत त्यामुळे महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटना ग्रामपंचायत कर्मचारी कामगार ग्राम रोजगार सेवक संघ तसेच ग्रामपंचायत चा कारभार चालवणारे सरपंच सदस्य, ग्रामसेवक ऑपरेटर इत्यादी मागण्यासाठी १८ ते २० डिसेंबर २०२३ ग्रामपंचायती मध्ये काम बंद आंदोलन राहणार सुरु त्यामुळे अनेक जणांना काम करण्यासाठी होतो

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT